जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/ 1169 /२०२२.
दि. 20 JUN 2022

रजि.ए.डी

नोटीस

प्रति,
कैलास मंडप अॅन्ड लाईट डेकोरेटर्स,
श्री विशाल गणेश मंदिरा समोर,
माळीवाडा, अहमदनगर.

विषय:- श्री रामनवमी उत्सव-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे कामासाठी भरलेल्या ई-निविदे बाबत..

संदर्भ – आपण दि.०२/०३/२०२२ अन्वये भरलेली ई-निविदा.

संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव सन-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीमध्ये साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेसाठी संस्थान परिसरामध्ये मंडप उभारणेकामी ई-निविदा प्रकीया राबविणेत आली होती. सदरहू कामासाठी आपण दि.०२/०३/२०२२ भरलेले होती. आपले ई-निविदेतील वाणिज्यिक देकार निम्नतम असल्याने आपणास मंडप उभारणीचे कामाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०३/२०२२ रोजीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आले होते.

सदरहू सभेत निर्णय क्र.१९१ खालील प्रमाणे निर्णय समंत झाला आहे.

*" संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था उभारणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.कैलस मंडप अॅन्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री.मिलींद कानडे हे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सभेस सांगितले की आमचे मालक श्री.पंडीतराव खरपुडे हे आजारी असून त्यांना रुग्णालयात दाखल केलेले आहे. त्यामुळे ई-निविदेप्रमाणे सर्व मंडप ते करु शकणार नाहीत. फक्त काही ठराविक मंडपाचे काम करण्यास ते तयार आहेत. अशा प्रकारे ई-निविदेतील एकूण कामाच्या सुमारे २५ % काम करण्याची तयारी दर्शविल्यामुळे निविदेतील अटी-शर्तीचा भंग होत आहे. त्यामुळे सदर निविदाधारक यांची बयाणा रक्कम जप्त करुन त्यांचे नावाचा पुढील तीन वर्ष कालावधीसाठी काळया यादीत समावेश करण्यात यावा असे ठरले... "*

उपरोक्त निर्णयानुसार आपण ई-निविदे सोबत जमा केलेली बयाणा रक्कम रु.२४,९००/- मात्र जप्त करणेत येत आहे. तसेच आपले नाव पुढील तीन वर्षासाठी काळया यादीत टाकणेत आले आहे, याची नोंद घ्यावी.

(राहूल जाधव)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
यांचे मान्यतेने.

प्रत – प्र. अधिक्षक. माहिती तंत्रज्ञान विभाग -
यांना पुढील कार्यवाहीसाठी